कंप्यानियन्स

को-ऑप. क्रेडिट सोसायटी, लि. चुळणे

स्थापना
२९ मे १९८४

मुख्य कार्यालय: यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे - ४०१२०२
Email ID : truecompanions1984 @gmail.com

आद्यप्रवर्तक



स्व. मायकल मने गोम्स

४१ वा वार्षिक अहवाल

सन २०२३ - २०२४



कंप्यानियन्स
को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., चुळणे.

संचालक मंडळ
सन २०२३-२४ ते २०२८-२९



श्री. फ्रान्सिस मस्करनीस
चेअरमन



श्री. अँथनी रॉड्रिग्ज
व्हा. चेअरमन



श्री. पिटर डिसोजा
संचालक



श्री. मनवेल डाबरे
संचालक



श्री. पायस मिरांडा
संचालक



श्री. आल्बर्ट नुनीस
संचालक



श्री. रेझी रॉड्रीग्ज
संचालक



श्री. आलेक्स डिसोजा
संचालक



श्री. रॉस्टन मिरांडा
संचालक



श्री. डॉमणिक डिसोजा
संचालक



सौ. क्लॉडिना डिकोस्टा
संचालिका



सौ. शरणलता डिकोस्टा
संचालिका



श्री. शैलेश राऊत
संचालक



श्री. प्रशांत संखे
संचालक



श्री. मेल्वीन असाव
संचालक



श्री. विनोद पाटील
तज्ञ संचालक



सौ. शैला अंड्राडीस
चीफ मॅनेजर

कंप्यानियन्स

को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., चुळणे.

रजि.नं.:टी.एन.ए.(व्हि.एस.आय.)आर.एस.आर./(सी.आर.)४२१/८३-८४

पत्ता : यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, पो. वसई रोड, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.

टेलि नंबर : (०२५०) २३८३०२२ / ९६६५०२०६००

email ID : truecompanions1984@gmail.com

⁘ संचालक मंडळ ⁘

सन २०२३-२४ ते २०२८-२९

१)	**श्री. फ्रान्सिस जॉन मस्करनीस**	चेअरमन
२)	**श्री. अँथनी टिबर्सीस रॉड्रिग्ज**	व्हा. चेअरमन
३)	**श्री. पिटर आलेक्स डिसोजा**	संचालक
४)	**श्री. मनवेल (राजू) अंतोन डाबरे**	संचालक
५)	**श्री. पायस फ्रान्सिस मिरांडा**	संचालक
६)	**श्री. आल्बर्ट मर्यान नुनीस**	संचालक
७)	**श्री. रेझी रॉक रॉड्रीग्ज**	संचालक
८)	**श्री. आलेक्स डॉमणिक डिसोजा**	संचालक
९)	**श्री. रॉस्टन बस्त्याव मिरांडा**	संचालक
१०)	**श्री. डॉमणिक जोसेफ डिसोजा**	संचालक
११)	**सौ. क्लॉडिना लेस्ली डिकोस्टा**	संचालिका (महिला राखीव)
१२)	**सौ. शरणलता तेजस डिकोस्टा**	संचालिका (महिला राखीव)
१३)	**श्री. शैलेश गजानन राऊत**	संचालक (अ.जा. जमाती)
१४)	**श्री. प्रशांत बाळकृष्ण संखे**	संचालक (भटक्या वि. जमाती)
१५)	**श्री. मेल्वीन अंतोन असाव**	संचालक (इतर मागासवर्गीय)
१६)	**श्री. विनोद मोहन पाटील**	तज्ञ संचालक

कंप्यानियन्स

को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

रजि.नं.:टी.एन.ए.(व्हि.एस.आय.)आर.एस.आर./(सी.आर.)४२१/८३-८४

यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, पो. वसई रोड,
ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.

टेलि नंबर : (०२५०) २३८३०२२ / ९६६५०२०६००

email ID : truecompanions1984@gmail.com

✤ संचालक मंडळ ✤

सन २०१६-१७ ते २०२०-२१

१)	**श्री. फ्रान्सिस जॉन मस्करनीस**	चेअरमन
२)	**श्री. अँथनी टिबर्सीस रॉड्रिग्ज**	व्हा. चेअरमन
३)	**श्री. फ्रान्सिस मर्यान नुनीस**	संचालक
४)	**श्री. मनवेल (राजू) अंतोन डाबरे**	संचालक
५)	**श्री. मनवेल फ्रान्सिस फरोज**	संचालक
६)	**श्री. मनवेल पॉल कोलासो**	संचालक
७)	**श्री. पायस फ्रान्सिस मिरांडा**	संचालक
८)	**श्री. शैलेश गजानन राऊत**	संचालक (अ.जा. जमाती)
९)	**श्री. विनोद मोहन पाटील**	संचालक (इतर मागासवर्गीय)
१०)	**श्रीमती अपलोनिया बी. मिरांडा**	संचालिका (महिला राखीव)
११)	**श्रीमती इजाबेल पॉल मिरांडा**	संचालिका (महिला राखीव)

✤ अंतर्गत लेखा परिक्षक ✤
मेसर्स व्हॅलेरियन रॉड्रिग्ज अॅन्ड असो.
सी. ए. वसई.
एफआरएन नं. १४६४०३डब्ल्यू

ऑडीट वर्ग 'ब'

✤ वैधानिक लेखा परिक्षक ✤
मे. योगेश पाटील अॅन्ड असो.
सनदी लेखापाल
नामतालिका क्र. १५०२७
वर्गवारी : अ-१

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, पो. वसई रोड, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.

❖ ३१ मार्च २०२४ अखेर संस्थेची माहिती ❖

(रकमेचे आकडे लाखांत)

संस्थेचे नांव	:	कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, चुळणे.
संस्थेचा पत्ता	:	यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.
संस्थेचा नोंदणी क्रमांक	:	टी. एन. ए. (व्हि. एस. आय.) आर. एस. आर. / (सी. आर.) ४२१ / ८३-८४
संस्थेचा स्थापना दिनांक	:	२९ मे १९८४
कार्यालयीन फोन	:	०२५० - २३८३०२२ / ९६६५०२०६००
सभासद संख्या	:	८,५२७
अधिकृत भाग भांडवल	:	रु. ७५०.००
वसूल भाग भांडवल	:	रु. ५६३.६८
एकूण निधी	:	रु. ४१०५.२४
ठेवी	:	रु. १२८४१.३६
कर्जे	:	रु. ५१९६.२१
गुंतवणूक	:	रु. १२१२८.५९
निव्वळ नफा	:	रु. २०५.९५
खेळते भांडवल	:	रु. १७९३३.९४
थकबाकीचे शेकडा प्रमाण	:	८.१९%
ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण	:	९.३२%
निव्वळ एन.पी.ए.	:	०%
ऑडीट वर्ग	:	ब
एकूण शाखा मुख्यालयासह	:	०४
एकूण कर्मचारी	:	१९

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, पो. वसई रोड, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.

✤ ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ✤

ह्या सूचनेद्वारे सर्व सन्माननीय सभासदांस कळविण्यांत येते की, वरील संस्थेची **४१ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ठीक ४.०० वाजता स्व. फ्रान्सिस मस्करनेस सभागृह, चुळणे, ता. वसई, जि. पालघर-४०१ २०२** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी सभेला वेळेवर हजर रहावे ही विनंती.

✤ सभेपुढील विषय ✤

१) दि. १७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ सालच्या अंदाजपत्रकातील अंदाजित खर्चापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
३) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, नफा-तोटा पत्रक आणि ताळेबंद पत्रकांस मंजूरी देणे.
४) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५) संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२४-२०२५ च्या अंदाज पत्रकास (उत्पन्न व खर्च) मान्यता देणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
७) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे. (लेखापरिक्षण अहवाल मुख्य कार्यालयात उपलब्ध आहे.)
८) सन २०२२-२०२३ च्या वैधानिक लेखापरिक्षणाचा दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९) सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षाकरिता शासनाने निश्चित केलेल्या लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांना नियमाप्रमाणे अदा करावयाच्या लेखापरीक्षा शुल्कास मंजूरी देणे.
१०) सन २०२५-२०२६ ह्या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीसांची (सी.ए.) नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
११) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणारे विषय.

संचालक मंडळाच्या वतीने
सौ. शैला अंड्राडीस
चीफ मॅनेजर

चुळणे.
दि. : २९-०७-२०२४

✤ सभासदांस महत्त्वाच्या सूचना ✤

१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा अर्धा तास थांबवून, त्याच ठिकाणी, त्याच दिवशी, त्याच विषयांवर घेतली जाईल व त्यास कोरमची आवश्यकता नाही. (२) सभासदांस ४१व्या अहवालातील सभेपुढील विषयासंबंधी माहिती अगर लेखी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते शुक्रवार दि. १३-०९-२०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाठवावेत. (३) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर जाहीर झालेला लाभांश सभासदांच्या बचत खाती जमा केला जाईल. ज्या सभासदांची बचत खाती नाहीत व ज्यांनी आपल्या भागांवरील लाभांश घेतला नसेल त्यांनी तो घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. तीन वर्षांमागील न नेलेला लाभांश राखीव निधीमध्ये वर्ग केला जातो. (४) ज्या सभासदांच्या नावात व पत्त्यांत बदल झाला असेल त्यांनी भागाच्या दाखल्यासह संस्थेच्या संबंधित शाखेत बदल करण्याबाबत लेखी कळवावे. तसेच ज्या सभासदांनी आपले वारस बदलून घ्यावयाचे असतील अथवा नोंदवले नसतील त्यांनी ते नोंदवावेत. (५) सहकारी कायद्यातील दुरूस्तीनुसार सर्व सभासदांनी K.Y.C. निकषांचे पालन करणे आवश्यक आहे. आपण संस्थेच्या शाखेतून K.Y.C. फॉर्म घेऊन ते भरून द्यावेत.

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

❖ अध्यक्षांचे मनोगत ❖

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,
सप्रेम नमस्कार,

पूर्वी आपला समाज खूप गरीब होता. शेतीव्यवसाय हे प्रमुख उत्पन्नाचे साधन होते. पतसंस्था व बँकेची सोय नसल्याने नागरिक अधिक व्याजदराने सावकाराकडून कर्ज घेत असत. लोकांची ही समस्या ओळखून समाजधुरीण स्व. मायकल मने गोम्स ह्यांनी यंग मेन्स असोसिएशन, चुळणे ह्या संस्थेच्या माध्यमतून कंप्यानियन्स सोसायटीची स्थापना केली. पुढे प्रगतीची नवी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी १९८४ साली कंप्यानियन्स सोसायटीचे रूपांतर 'कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.' ह्या संस्थेत झाले. नागरिकांमध्ये बचतीची सवय, कमी व्याजदरामध्ये पतकर्ज व सभासदांशी सलोख्याचे संबंधामुळे आपली पतसंस्था कमी कार्यक्षेत्र असूनसुद्धा प्रगतीमध्ये घोडदौड करीत राहिली. जवळपास ९२ वर्षाचा इतिहास असलेली आपली पतसंस्था चुळणे व परिसरातील नागरिकांची अस्मिता बनली.

मागील सहा वर्षांमध्ये आपल्या संस्थेला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. PMC बँक घोटाळ्यामुळे संस्थेचा मोठा निधी अडकून पडला. या कारणामुळे आपल्याला वार्षिक अंदाजे दीड कोटीच्या आसपास उत्पन्नामध्ये घट झाली. नागरिकांचा दबाव असल्यामुळे केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली रिझर्व्ह बँकेने तयार केलेल्या विलीनीकरणाच्या योजनेस मान्यता मिळाली व २५ जानेवारी २०२२ रोजी PMC बँकेचे विलीनीकरण युनिटी स्मॉल फायनान्स बँकेमध्ये झाले. आता आपला अडकलेला मोठा निधी दहा वर्षानंतर परत मिळण्याची खात्रीलायक आशा निर्माण झाली आहे.

२०२० मध्ये कोरोना महामारीचे संकट आल्यामुळे संपूर्ण जगाचीच प्रगतीची चाके उलटी फिरली. लोकांचा रोजगार गेला. त्यामुळे आपल्या NPA ची टक्केवारी वाढली. कर्जसुद्धा ह्या काळामध्ये कमी झाले. कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नामुळे NPA ची टक्केवारी कमी करण्यात यश आले. मर्यादित कार्यक्षेत्र असल्यामुळे नवीन व चांगले कर्जदार मिळणे आता मोठे आव्हान होऊन बसले आहे.

आर्थिक वातावरण आव्हानात्मक होत आहे. नियमांचे मापदंड अधिक काटेकोर होत चाललेले आहेत. ह्या सर्वांवर मात करून चांगले ठेवीदार व कर्जदार शोधणे हे आपल्या सर्वांसाठी एक आव्हान आहे. निवडून आलेले नवीन संचालक मंडळ हे आव्हान स्वीकारण्यासाठी कटीबद्ध आहेत. ठेवी व कर्जामध्ये मागील चार-पाच वर्षांपासून घट होत आहे. ह्या आर्थिक वर्षामध्ये (२०२४-२०२५) सकारात्मक वाढीमध्ये बदलण्याचा मानस आहे. तसेच पुढील दोन वर्षामध्ये ढोबळ NPA ची टक्केवारीदेखील ५% च्या खाली आणून आपले संस्थेचे कार्यक्षेत्र कमीत कमी वसई तालुका करण्याचा आमचा प्रयत्न आहे. एवढ्या संकटांमध्येसुद्धा आपली पतसंस्था खंबीरपणे उभी आहे.

आपण देत असलेल्या पाठिंब्यामुळे ह्या आर्थिक वर्षामध्ये चांगली प्रगती करू अशी आशा व्यक्त करतो. आपल्या सर्वांचे आभार मानून माझे मनोगत पूर्ण करतो.

जय हिंद! जय सहकार!!

आपला सहकारी,
श्री. फ्रान्सिस जॉन मस्करनीस
अध्यक्ष
कंप्यानिअन्स को-ऑप. क्रे. सो. लि.

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

✤ ४१ वा वार्षिक अहवाल ✤

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या संस्थेच्या ४१ व्या वर्षाच्या कामकाजाचा अहवाल व त्यासोबत अंतर्गत व शासकीय लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ३१ मार्च २०२४ अखेरचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यापुढे सादर करीत आहे.

सभासद संख्या व भाग भांडवल :

	सभासद	भागभांडवल	
दि. ३१-०३-२०२३ अखेर	८,५३९	रु.	५,६३,०९,०२०.००
मृत्यू व राजीनाम्याद्वारे कमी	- १६३	रु.	- १२,९३,२४०.००
	८,३७६		५,५०,१५,७८०.००
अहवाल वर्षात झालेली वाढ	+ १५१	रु.	+ १३,५२,३००.००
एकूण दि. ३१-३-२४ अखेर	**८,५२७**	**रु.**	**५,६३,६८,०८०.००**

आर्थिक व्यवहार :

अहवाल साली झालेल्या प्रमुख व्यवहारातील आकडे गतसालच्या तुलनेने वाढीच्या टक्केवारीसह खालील तक्त्यांत दिले आहेत. (रुपये लाखांत)

व्यवहाराचे नाव	३१ मार्च २०२३ अखेर	३१ मार्च २०२४ अखेर	वाढ / घटीची रक्कम	टक्केवारी
भाग भांडवल	५६३.०९	५६३.६८	०.५९	०.१०
राखीव व इतर निधी	३,९४३.४६	४,१०५.२४	१६१.७८	४.१०
ठेवी	१२,७३१.४७	१२,८४१.३६	१०९.८९	०.८६
गुंतवणूक	११,९८३.३४	१२,१२८.५९	१४५.२५	१.२१
कर्ज	५,३८५.१७	५,१९६.२१	- १८८.९६	- ३.५०
खेळते भांडवल	१७,७७१.३३	१७,९३३.९४	१६२.६१	०.९२
एकूण उत्पन्न	१,१८६.६०	११४३.८७	- ४२.७३	- ३.६०
तरतूदीपूर्व नफा	३५८.०९	२३९.५२	- ११८.५७	- ३३.११
निव्वळ नफा	२०४.५९	२०५.९५	१.३६	०.६६

स्वनिधी :

संस्थेचे स्वनिधी हे भविष्यात येणाऱ्या कोणत्याही आर्थिक संकटाला तोंड देऊन यशस्वी होण्याचे निर्देशक असतात. आपल्या संस्थेचे स्वनिधी दरवर्षी वाढत आहेत. स्वनिधी अधिक तितका आपल्या संस्थेचा आर्थिक पाया मजबूत. ह्यावर्षी आपल्या संस्थेचे स्वनिधी ४६ कोटीच्यावर गेले आहेत.

शाखानिहाय प्रगती दर्शक तक्ता : (३१-३-२०२४ अखेर)

सोसायटीच्या तीनही शाखा आपआपल्या परिसरात उत्तम कार्य करीत असून दिवसेंदिवस त्यांच्या प्रगतीत वाढ होत आहे. सभासदांच्या माहितीकरीता शाखानिहाय माहिती खालील कोष्टकात देत आहोत.(रक्कम लाखांत)

शाखा	सभासद संख्या	भाग भांडवल	ठेवी	कर्ज	नफा	थकबाकीचे कर्जाशी प्रमाण
मुख्यालय	--	--	--	२३.८०	१७१.१७	--
चुळणे	२४२०	१८७.०२	६३९८.१९	११८७.६०	२०.११	७.०१%
मा. गोम्स मार्ग	३६७६	२२४.७०	३७६३.७६	२२९१.२९	३६.४३	६.४५%
सेंट ऑ. नगर	२४३१	१५१.९६	२६७९.४१	१६९३.५२	११.८१	११.४८%

गुंतवणूक :

अहवालवर्षी सोसायटीने गुंतवणूक केलेल्या बँकनिहाय गुंतवणूकीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	बँकेचे नाव	सन २०२२-२३ रक्कम (रुपये लाखात)	सन २०२३-२४ रक्कम (रुपये लाखात)
१)	बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि.	२,९१४.१७	३२३४.९२
२)	सारस्वत को-ऑप. बँक लि.	३६८.२३	२०३.३०
३)	ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.	२,९५८.५७	१८६१.९५
४)	वसई विकास सहकारी बँक लि.	१,७०५.८६	५४.८३
५)	कॉसमॉस को-ऑप. बँक लि.	२६.०४	१३०.३२
६)	मॉडेल को-ऑप. बँक लि.	२१७.१८	३४०.३३
७)	दि म्युनसिपल को-ऑप. बँक लि.	३०२.८५	२३३४.९९
८)	शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.	४१८.९१	४४३.०२
९)	नेवल डॉकयार्ड को-ऑप. बँक लि.	५०५.०७	९५८.४७
१०)	युनिटी स्मॉल फायनान्स बँक प्रिफरेन्स शेअर्स	२,१७९.१०	२१७९.१०
११)	युनिटी स्मॉल फायनान्स बँक इक्विटी वॉरंट्स	३८७.२७	३८७.२७
१२)	पतसंस्था राज्य व तालुका फेडरेशन भाग	०.०९	०.०९
	एकूण	**११,९८३.३४**	**१२१२८.५९**

गुंतवणूक करताना सक्षम बँकाच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण करून त्यांच्या व्यवसायाची माहिती प्राप्त करून संचालक मंडळ गुंतवणूक करण्याचे निर्णय घेत असते. बँकेतील गुंतवणूक सुरक्षित व संरक्षित कशी राहील याची काळजी संचालक मंडळ घेत असते. सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभूमीवर अहवाल वर्षी अधिकतम परतावा मिळणेसाठी निधीचे कटाक्षाने व्यवस्थापन करून अतिरिक्त निधीची विविध मान्यताप्राप्त व शेड्युल्ड सहकारी बँकांमध्ये गुंतवणूक केल्याने अहवाल साल अखेर एकूण गुंतवणूक रु. १२१.२८ कोटींची झालेली आहे. सदर गुंतवणूक व्यवहारातून संस्थेस रु. ६.९१ कोटी व्याज उत्पन्न प्राप्त झाले आहे.

खेळते भांडवल :

ह्या आर्थिक वर्षात सोसायटीचे खेळते भांडवल रु. १७९.३३ कोटी इतके झाले आहे.

अनुत्पादित (NPA) कर्जे :

संस्थेच्या प्रशासनाने सातत्याने प्रयत्न करून अहवाल सालात निव्वळ एन.पी.ए. ०% राखण्यात यश मिळविले आहे. ३१ मार्च २०२४ अखेरची एन.पी.ए. खाती व रक्कम दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे :

(रक्कम लाखांत)

अ. क्र.	मालमत्ता वर्गीकरण	२०२२-२०२३			२०२३-२०२४	
		कालावधी महिने	खाती	रक्कम	खाती	रक्कम
१	समाधानकारक कर्जे (Standerd Assets)	०-६	९०५	४,७७२.६३	८०३	४७११.७२
२	असमाधानकारक कर्जे (Sub Standerd Assets)	७-१८	७१	२१०.६६	४२	१८७.१५
३	संशयित कर्ज-१ (Bad / Doubtful Assets-1)	१९-४२	४६	१०५.६९	५६	१२५.२०
४	संशयित कर्ज-२ (Bad / Doubtful Assets-2)	४३-५२	१०	२०.२५	१०	१४.१३
५	संशयित कर्ज-३ (Bad / Doubtful Assets-3)	५३ ते पुढे	५४	२७५.९४	५६	१५८.०१
६	बुडित कर्ज (Loss Assets)		--	--	--	--
	एकूण		१०८६	५,३८५.१७	९६७	५१९६.२१

कर्जे व कर्ज वसूली :

संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत कर्ज व्यवहार असतो. असे जरी असले तरी आपल्या संस्थेने नेहमी ग्राहकाचा विचार करत कर्जावरील व्याजदर कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सी. डी. रेशो वाढविण्यावर

तसेच जास्तीत जास्त तारणी कर्जे वितरीत करून सुरक्षित बँकींग व्यवसाय करण्याकडे संचालक मंडळाने लक्ष केंद्रीत दिले आहे. वसूलीच्या कामात अनेक प्रकारचे अडथळे येत असतात. मात्र थकीत कर्जाच्या वसूलीसाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करीत असते.

अहवाल वर्षअखेर अनुत्पादित ढोबळ कर्जाचे प्रमाण एकूण येणे कर्जाशी प्रमाण ९.३२% इतके आहे. संस्थेचे निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ०% आहे. अहवाल साली एकूण अनुत्पादित कर्जाची रक्कम रु. ४.८४ कोटी आहे. गतवर्षी ही रक्कम रु. ६.१२ कोटी इतकी होती व त्याचे एकूण कर्जाशी प्रमाण ११.३७% होते.

लवाद दावे :

अहवाल वर्षात नवीन ४७ लवाद दावे दाखल केले. आतापर्यंत सोसायटीने केलेल्या लवाद दाव्यांची सहकार खात्याकडून वसूलीचे दाखले मिळालेल्या व वसूल झालेल्या थकबाकीदार प्रकरणाची विगतवारी पुढीलप्रमाणे आहे.

तपशील	प्रकरणे	येणे रक्कम रुपये
३१ मार्च २०२३ अखेर येणे प्रकरणे व रक्कम	८४	१,४५,५८,४४५.००
अहवाल साली नवीन प्रकरणे दाखल	४७	२,०४,०४,४३४.००
एकूण	१३१	३,४९,६२,८७९.००
पैकी अहवालसाली वसूली	२१	१,९८,९५,०७४.००
३१ मार्च २०२४ अखेर बाकी	११०	१,५०,६७,८०५.००

संचालक व नातेवाईकांस कर्ज :

संचालकांस व त्यांच्या नातेवाईकांस दिलेल्या कर्जाची माहिती खालील प्रमाणे आहे.

तपशील	कर्ज संख्या	वर्ष सुरवातीस कर्ज येणे रक्कम	वर्ष २०२३-२४ मध्ये दिलेले कर्ज + व्याज	वर्ष २०२३-२४ मध्ये वसूल कर्ज + व्याज	३१/३/२०२४ अखेर येणे कर्ज	थकबाकी
संचालक	३	४२,६५,७७८.००	३,५८,५३३.००	२४,८२,२६०.००	२१,४२,०५१.००	----
नातेवाईक	४	७०,७८,३७०.००	५,९६,५७९.००	२०,७९,०००.००	५५,९५,९४९.००	----

नफा व नफा वाटणी :

अहवाल साली संस्थेस रु. २,३९,५२,४६९.१६ इतका ढोबळ नफा झालेला आहे. यामधून वैधानिक व आवश्यक असलेल्या रु. ३३,५७,०५६/- च्या तरतूदी वजा जाता संस्थेस रु. २,०५,९५,४१३.१६ इतका निव्वळ नफा झाला असून संचालक मंडळाने त्याची पुढीलप्रमाणे वाटणी करण्याची शिफारस केली आहे. त्यास आपण मंजूरी द्यावी.

निव्वळ नफा		रु.	२,०५,९५,४१३.१६
वैधानिक राखीव निधी	२५%	रु.	५१,४८,८५३.००
लाभांश (डिव्हिडंड)	१०%	रु.	५५,५६,८५३.००
लाभांश समकरण निधी	२%	रु.	११,२७,३६१.००
इमारत निधी		रु.	१०,००,०००.००
सदस्य शिक्षण, संस्कार इ. निधी		रु.	१,००,०००.००
सार्वजनिक धर्मदाय निधी		रु.	२,००,०००.००
कर्मचारी हितवर्धक निधी		रु.	१,००,०००.००
सभासद हितवर्धक निधी		रु.	५,००,०००.००
संचालक / कर्मचारी प्रशिक्षण निधी		रु.	१,००,०००.००
मानधन		रु.	३०,०००.००
संगणक खर्च तरतूद		रु.	५,००,०००.००
नियामक मंडळ अंशदान निधी		रु.	१३,००,०००.००
गुंतवणूक चढउतार निधी		रु.	४९,३२,३४६.१६
	एकूण	**रु.**	**२,०५,९५,४१३.१६**

सामाजिक बांधिलकी :

अहवाल वर्षात सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून आपल्या संस्थेने परिसरांतील एका सामाजिक संस्थेला त्यांच्या लोकोपयोगी कामासाठी रु. १०,०००/- ची मदत सदस्य शिक्षण, संस्कार इ. निधीतून दिली आहे.

सभासद हितवर्धक निधीतून वैद्यकिय मदत :

अहवाल वर्षात सभासद हितवर्धक निधी गुंतवणूक व्याजातून सोसायटीच्या २० सभासदांना रु. १,००,०००.०० त्यांच्या गंभीर आजारपणात मदत करण्यांत आली.

संस्थेची पंचवार्षिक निवडणूक :

संस्थेच्या संचालक मंडळाची सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या कालावधीची मुदत दि. ४ नोव्हेंबर २०२१ रोजी संपलेली होती. परंतु कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे शासनाकडून सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. त्यानंतर शासनाने सर्व नियम शिथील केल्याने महाराष्ट्र राज्य निवडणूक प्राधिकरणाने निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या व सहकारी संस्थांच्या वर्गवारीनुसार निवडणूक कार्यक्रम निश्चित केले. त्यानुसार आपल्या कंप्यानियन्स को-ऑप. क्रे. सो. लि. या संस्थेची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणेसाठी निवडणूक प्राधिकरणाने निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मा. श्री. सुहास नाना पवार, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग १ यांची नेमणूक केली होती. त्यांनी जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन केलेल्यापैकी अनेकांनी माघार घेतल्याने निवडणूक बिनविरोध झाली. १५ संचालक सदस्यांपैकी १० सर्वसाधारण गट, २ महिला राखीव गट, १ इतर मागासवर्गीय गट, १ अनुसूचित जाती/जमाती गट, १ विशेष मागास प्रवर्ग गट असे संचालक निवडून आलेले आहेत.

प्रशिक्षण शिबीर :

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे यांचे विद्यमाने संस्थेच्या संचालक मंडळ सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी २७ मार्च २०२४ रोजी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात ऑडीट, नवीन नियमावली, ग्राहक टिकवणे एक आव्हान, कर्ज वसूली या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

कर्मचारी वर्ग :

अहवाल वर्ष अखेर संस्थेमध्ये १ सरव्यवस्थापक-मुख्यालय, ३ शाखाव्यवस्थापक, १ वसूली अधिकारी, ४ वरिष्ठ अधिकारी, ४ कनिष्ठ अधिकारी, १ लिपिक व ५ शिपाई असा कर्मचारी वर्ग आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षमतेने व सेवाभावी वृत्तीने संस्थेच्या प्रगतीमध्ये मोलाचे सहकार्य केलेले आहे.

संचालक सभा :

अहवाल साली संचालक मंडळाच्या २८ व उपसमित्यांच्या ५ सभा झाल्या. सोसायटीचे कामकाज यशस्वीरीतीने पार पाडण्यास सोसायटीचे व्हाईस चेअरमन व सर्व संचालकांनी बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद.

लेखापरिक्षण :

सोसायटीचे सन २०२३-२०२४ सालचे अंतर्गत लेखा परिक्षण मेसर्स व्हेलेरीयन रॉड्रीग्ज ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, वसई ह्यांनी पूर्ण केले. तसेच २०२३-२०२४ सालचे शासकीय लेखापरीक्षण मेसर्स योगेश पाटील ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, नवी मुंबई ह्यांनी पूर्ण केले. त्यांनी सोसायटीच्या कामकाजाबद्दल व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. लेखा परिक्षकांचा दाखला अहवालात दिलेला आहे.

सदिच्छा भेट :

पालघर जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक मा. श्री. शिरीष कुलकर्णीसाहेब व उपनिबंधक सहकारी संस्था वसईचे मा. श्री. अमर शिंदे साहेब ह्यांनी आपल्या संस्थेला दि. २० जून २०२४ रोजी सदिच्छा भेट दिली. येणाऱ्या काळात सातत्यपूर्ण प्रगती करून यशाची नवी शिखरे गाठण्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेला दिलेल्या मौलिक मार्गदर्शनाबद्दल संचालक मंडळ त्यांचे मनापासून आभार मानीत आहे.

KYC Norms ची पूर्तता :

संस्थेच्या आदर्श उपविधी-ड-सभासदत्व- ११ - सर्वसाधारण सभासदासाठी अटी - इ नुसार KYC निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थेच्या सभासदांनी आपला पॅन कार्ड, आधार कार्ड, फोटो व अद्ययावत मोबाईल क्रमांक याची नोंदणी करून KYC Norms ची पूर्तता करावी. त्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या नक्कल प्रती स्वप्रमाणित करून त्या शाखा कार्यालयात सादर कराव्यात.

ज्या सभासदांच्या नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक यात बदल झाला आहे, त्यांनी योग्य कागदपत्रांच्या आधारे तसा बदल नोंदविण्यासाठी शाखा कार्यालयाशी संपर्क साधावा.

सभासद तसेच ठेवीदारांनी आपला वारस नेमणे कायद्याने बंधनकारक असल्याने, ज्यांची वारस नेमणूक बाकी आहे तसेच ज्यांना नेमलेला वारस बदलून घ्यावयाचा आहे, त्यांनी योग्य त्या बदलासाठी संबंधित शाखेशी लेखी अर्जाद्वारे संपर्क साधून कार्यवाही पूर्ण करावी.

मयत सभासदांच्या मृत्यू नोंदणीबाबत :

संस्थेच्या सर्व सभासदांस नम्र विनंती करण्यात येते की, संस्थेच्या मयत सभासदांच्या कुटुंबीय / वारसदारांनी

संस्थेच्या शाखेत संपर्क साधून, योग्य कागदपत्रांची पूर्तता करून, मयत सभासदाचे सभासदत्व रद्द करणे कामी अथवा संस्थेच्या मृत सभासदांच्या नावावरील भाग रक्कम व ठेव रक्कम नामनिर्देशित व्यक्ती, वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी या व्यक्तीकडे हस्तांतरीत करण्यासाठी कार्यवाही करून सहकार्य करावे.

श्रद्धांजली :

अहवाल साली निधन पावलेले सोसायटीचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक, सहकार क्षेत्रातील मान्यवर व ज्ञात अज्ञात कार्यकर्ते ह्यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करतो व त्यांना श्रद्धांजली वाहून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी म्हणून प्रार्थना करतो.

ऋणनिर्देश :

- नियामक मंडळ अध्यक्ष तथा सहकार आयुक्त मा. श्री. अनिल कवडेसाहेब, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे.
- महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री. काकासाहेब कोयटे व त्यांचे सहकारी.
- पालघर जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष मा. श्री. शरद जाधव, सरचिटणीस मा. श्री. आल्बर्ट अथाईत व त्यांचे सहकारी.
- पालघर जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक मा. श्री. शिरीष कुलकर्णी साहेब यांचे मन:पूर्वक आभार.
- माननीय श्री. अमर शिंदे, उपनिबंधक, सहकारी संस्था, वसई व त्यांचे कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे मन:पूर्वक आभार.
- मेसर्स योगेश पाटील ॲण्ड कंपनी, सनदी लेखापाल.
- मेसर्स व्हॅलेरीयन रॉड्रीग्ज ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट, अंतर्गत लेखापरीक्षक.
- मा. तहसीलदार, वसई तहसील, सभापती, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वसई.
- मॅनेजर, बॅसीन कॅथॉलिक को-ऑप. बँक लि., माणिकपूर शाखा.
- मॅनेजर, दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, वसई रोड शाखा.
- विशेष वसूली व विक्री अधिकारी श्री. बी. एच. गायकवाड.
- ठाणे जिल्हा सहकारी बोर्डाचे अधिकारी श्री. टी. के. पानसकर साहेब.
- वसई तालुका सहकारी मुद्रणालयाचे व्यवस्थापन मंडळ व सर्व कर्मचारी वर्ग.
- संस्थेचे सर्व ग्राहक, खातेदार, कर्जदार, ठेवीदार.

मा. व्हा. चेअरमन, सहकारी संचालक, सभासद, कर्मचारी व ठेवीदार ह्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानतो. आपल्या सर्वांच्या विश्वासाच्या व सहकार्याच्या आधारावर संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो व नावलौकिक वाढो अशी सदिच्छा व्यक्त करून हा अहवाल पूरा करतो. असेच मार्गदर्शन व सहकार्य सतत मिळत राहो अशी ईश्वराकडे प्रार्थना करतो.

धन्यवाद! **जय हिंद! जय महाराष्ट्र! जय सहकार!**

आपला विश्वासू

चुळणे, वसई. **श्री. फ्रान्सिस जॉन मस्करनीस**

दि. : २४-०७-२०२४ चेअरमन

संचालक मंडळाच्या वतीने

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

सन २०२४ - २०२५ करीता अंदाजी नफा तोटा पत्रक

२०२३-२०२४ चा अंदाज रुपये पैसे	खर्च	२०२३-२०२४ चा प्रत्यक्ष परिणाम रुपये पैसे	२०२४-२०२५ चा अंदाज रुपये पैसे
८,००,००,०००.००	ठेवीवर व्याज	७,७०,८९,८७६.००	७,९२,००,०००.००
१,०५,००,०००.००	पगार, भविष्यनिधी, ग्रॅच्युईटी	१,०४,६२,६९७.००	१,०८,००,०००.००
२,५०,०००.००	विमा हप्ता	२,०२,४६२.००	२,३५,०००.००
६,८०,०००.००	कार्यालय भाडे, दिवाबत्ती, देखभाल खर्च	६,९३,५२३.००	८,००,०००.००
२,००,०००.००	बुक्स, प्रिंटींग व स्टेशनरी	२,१८,३६४.४९	३,००,०००.००
१,००,०००.००	प्रवास, पोस्टेज व टेलीफोन	७६,७७४.००	९०,०००.००
५०,०००.००	जाहिरात	४२,०००.००	५०,०००.००
४,००,०००.००	डेडस्टॉक, इमारत घसारा व दुरुस्ती	२,८१,२४५.००	३,५०,०००.००
१,७५,०००.००	संचालक मंडळ व सर्वसाधारण सभा खर्च	१,२५,१८०.००	१,५०,०००.००
६०,०००.००	किरकोळ खर्च	८३,८१७.३३	१,००,०००.००
६,५०,०००.००	संगणक मेन्टनन्स खर्च	६,४२,७९१.००	७,००,०००.००
१,७५,००,०००.००	तरतूदी	३३,५७,०५६.००	५१,००,०००.००
८,००,०००.००	बँक ठेव कर्जावरील व्याज	३,७८,४९४.००	४,००,०००.००
२,८०,०००.००	सादिलवार खर्च	१,३७,९५७.५२	१,५०,०००.००
२,२५,००,०००.००	अपेक्षित निव्वळ नफा	२,०५,९५,४१३.१६	२,१०,००,०००.००
१३,४१,४५,०००.००	**एकूण बेरीज**	**११,४३,८७,६५०.५०**	**११,९४,२५,०००.००**

२०२३-२०२४ चा अंदाज रुपये पैसे	उत्पन्न	२०२३-२०२४ चा प्रत्यक्ष परिणाम रुपये पैसे	२०२४-२०२५ चा अंदाज रुपये पैसे
६,१०,००,०००.००	कर्जावर व्याज	४,३९,२०,१०९.५०	४,९०,००,०००.००
७,२८,००,०००.००	गुंतवणुकीवर व्याज	६,९१,४७,३३१.००	७,००,००,०००.००
३,४५,०००.००	इतर उत्पन्न	१३,२०,२१०.००	४,२५,०००.००
१३,४१,४५,०००.००	**एकूण बेरीज**	**११,४३,८७,६५०.५०**	**११,९४,२५,०००.००**

श्री. फ्रान्सिस मस्करनीस
चेअरमन

श्री. अँथनी रॉड्रीग्ज
व्हा. चेअरमन

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह

दि. ३१ मार्च २०२४ अखेरचे

२०२२-२०२३ रुपये पैसे	खर्च	२०२३-२०२४ रुपये पैसे
७,०४,२७,७६६.६०	**ठेवीवरील व्याज**	७,७०,८९,८७६.००
	व्यवस्थापन व इतर खर्च	
९३,१८,०७१.००	१) कर्मचारी पगार, भविष्य निधी	१,०४,६२,६९७.००
२,०५,०५१.००	२) विमा हप्ता	२,०२,४६२.००
४,३९,१४४.००	३) कार्यालय भाडे, देखभाल खर्च	४,७०,४२०.००
१,८५,२०४.७५	४) बुक्स, प्रिंटिंग व स्टेशनरी	२,१८,३६४.४९
८४,२८३.४२	५) प्रवास, पोस्टेज, टेलिफोन	७६,७७४.००
३१,५००.००	६) जाहिरात	४२,०००.००
५२,३०४.००	७) डेडस्टॉक व इमारत दुरुस्ती	३७,१७४.००
१,४५,२३९.००	८) संचालक मंडळ व सर्वसाधारण सभा खर्च	१,२५,१८०.००
२७,६१४.९९	९) किरकोळ खर्च	८३,८१७.३३
१,८६,७८०.९७	१०) साफसफाई, दिवाबत्ती	२,२३,१०३.००
४,३९,९६८.४६	११) संगणक व सॉफ्ट. मेन्टेनन्स खर्च	६,४२,७९१.००
२,५२,१७०.००	१२) डेडस्टॉक व इमारत घसारा	२,४४,०७१.००
२,०१४.००	१३) जनरेटर देखभाल खर्च	३,७२६.००
९९,४७७.५४	१४) जी.एस.टी.	२८,५३०.००
४,०००.००	१५) ट्रेड सर्टी. व फेडरेशन फी	----
१,५३,९६३.२२	१६) बँक चार्जेस, वसूली खर्च व सल्लागार फी	१,०४,९५१.५२
७५०.००	१७) संस्था व्यवसाय कर	७५०.००
१,१६,२७,५३६.३५		१,२९,६६,८११.३४
७,९५,६३८.००	**बँक ठेव कर्ज व्याज**	३,७८,४९४.००
८,२८,५०,९४०.९५	बेरीज पुढील पानावर	९,०४,३५,१८१.३४

क्रेडिट सोसायटी लि.

नफा तोटा पत्रक

२०२२-२०२३ रुपये पैसे	उत्पन्न	२०२३-२०२४ रुपये पैसे
५,६७,०९,१८८.००	**कर्जावर व्याज**	४,३९,२०,१०९.५०
	गुंतवणूकीवर व्याज	
५,९३,८६,४३२.००	१) बँक गुंतवणूकीवर	६,६७,८८,१३३.००
१५०.००	२) बँक भागावर लाभांश	१५०.००
२१,७९,१०१.००	३) युनिटी स्मॉ. फाय. शेअर्स डिव्ही.	२१,७९,१०१.००
६,१५,६५,६८३.००		**६,८९,६७,३८४.००**
१,७३,५१०.००	**बँक बचत खाती व्याज**	**१,७९,९४७.००**
	इतर उत्पन्न	
१७,७५६.५०	१) एम.एस.ई.बी. सेक्यू. डि. व्याज	१७,७५७.००
१,९४,३११.१३	२) नोटीस फी, पेनल व्याज	३,०९,७९५.००
----	३) शिल्लक तरतूद (निवडणूक)	९,९२,६५८.००
२,१२,०६७.६३		**१३,२०,२१०.००**
११,८६,६०,४४८.६३	बेरीज पुढील पानावर	११,४३,८७,६५०.५०

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह

दि. ३१ मार्च २०२३ अखेरचे

२०२२-२०२३ रुपये	पैसे	खर्च	२०२३-२०२४ रुपये	पैसे
८,२८,५०,९४०.९५		बेरीज मागील पानावरुन	९,०४,३५,१८१.३४	
		तरतुदी		
५,००,०००.००		१) ऑडीट फी	५,००,०००.००	
५०,००,०००.००		२) बुडीत कर्ज निधी तरतूद	----	
१०,००,०००.००		३) संगणकीकरण निधी	७,१७,९११.००	
४०,००,०००.००		४) गुंतवणूक चढ उतार निधी	५,००,०००.००	
५,००,०००.००		५) निवडणूक खर्च तरतूद	----	
५५०,०००.००		६) कर्मचारी बोनस	६,५०,०००.००	
८,००,०००.००		७) कर्मचारी ग्रॅच्युटी तरतूद	३,००,०००.००	
५,००,०००.००		८) कर्मचारी रजेचा पगार तरतूद	५,००,०००.००	
----		९) व्यवसाय उदात्तीकरण व विपणन	१,८९,१४५.००	
२५,००,०००.००		९) वेतन करार तरतूद	----	
१,५३,५०,०००.००			३३,५७,०५६.००	
२,०४,५९,५०७.६८		**निव्वळ नफा**	२,०५,९५,४१३.१६	
११,८६,६०,४४८.६३		**एकूण बेरीज**	११,४३,८७,६५०.५०	

श्री. फ्रान्सिस मस्करनीस
चेअरमन

श्री. अँथनी रॉड्रीग्ज
व्हा. चेअरमन

क्रेडिट सोसायटी लि.

नफा तोटा पत्रक

२०२२-२०२३ रुपये पैसे	उत्पन्न	२०२३-२०२४ रुपये पैसे
११,८६,६०,४४८.६३	बेरीज मागील पानावरुन	११,४३,८७,६५०.५०
११,८६,६०,४४८.६३	**एकूण बेरीज**	११,४३,८७,६५०.५०

मेसर्स व्हॅलेरीयन रॉड्रिग्ज ॲन्ड कंपनी
सी. ए., वसई
एफआरएन नं. १४६४०३डब्ल्यू

मेसर्स योगेश पाटील ॲन्ड असो.
सनदी लेखापाल
नामतालिका क्र. १५०२७, वर्गवारी : अ-१

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह

दि. ३१ मार्च २०२४

२०२२-२०२३ रुपये	पैसे	भांडवल व देणी	२०२३-२०२४ रुपये	पैसे
७,५०,००,०००.००		**अधिकृत भाग भांडवल**	७,५०,००,०००.००	
५,६३,०९,०२०.००		**वसूल भाग भांडवल**	**५,६३,६८,०८०.००**	
		राखीव व इतर निधी		
१४,२०,८३,६४६.९९		१) राखीव निधी	१४,७२,०९,०८५.९१	
६,२१,४०,०९८.३९		२) इमारत निधी	६,२१,४०,०९८.३९	
२५,३०,२६५.००		३) सार्वजनिक धर्मदाय निधी	२५,३०,२६५.००	
१,११,६८,१४२.००		४) लाभांश समकरण निधी	१,११,६८,१४२.००	
४०,६७,६४७.५०		५) सदस्य शिक्षण, संस्कार निधी	४०,५७,६४७.५०	
४९,०३,३८३.४८		६) विशेष अडचणीचा निधी	५४,०३,३८३.४८	
६,१०,४५,६८७.२६		७) बुडीत कर्ज व व्याज निधी	६,१०,४५,६८७.२६	
७२,००,०००.००		८) उत्तम जिंदगी तरतूद	७२,००,०००.००	
१,६७,८४,३१९.६९		९) सभासद हितवर्धक निधी	१,७७,४८,३१९.६९	
६०,८३,२५७.५०		१०) कर्मचारी हितवर्धक निधी	६४,६६,३९१.५०	
७९,८३,१००.००		११) संगणकीकरण निधी	८७,०१,०११.००	
६,८३,५७,२६२.६५		१२) गुंतवणूक चढ उतार निधी	७,६८,५४,४०३.४१	
३९,४३,४६,८१०.४६			**४१,०५,२४,४३५.१४**	
		ठेवी		
१५,७९,९०,५६१.७५		१) बचत ठेव	१५,२०,५२,६५४.६०	
२,९६,१५,०२२.००		२) आवर्त ठेव	३,१२,८३,६५५.००	
१,६७,५२,०००.००		३) सुलभ साथी ठेव	१,५०,४६,०००.००	
१३,७१,२९,८४०.००		४) मासिक प्राप्ती ठेव	१२,८१,५५,३४०.००	
५,१४,६८,७१९.००		५) मुदत ठेव	६,७३,६३,२०३.००	
८८,०१,९१,४१५.००		६) धन द्विगुणीत ठेव	८९,०२,३५,७०३.००	
१,२७,३१,४७,५५७.७५			**१,२८,४१,३६,५५५.६०**	
१,८३,६८,१९२.००		**बँक ठेव कर्ज**	**१०,९२९.६०**	
१,७४,२१,७१,५८०.२१		बेरीज पुढील पानावर	१,७५,१०,४०,०००.३४	

क्रेडिट सोसायटी लि.

अखेरचा ताळेबंद

२०२२-२०२३ रुपये	पैसे	मालमत्ता व येणी	२०२३-२०२४ रुपये	पैसे
		रोख व बँक खाती शिल्लक		
१८,५६,९७४.	९५	१) रोख शिल्लक	२१,०५,७९४.	२०
१३,९२,२१९.	२०	२) बँक बचत खाती	३९,८७,५५९.	४५
१,०३,२५०.	२१	३) बँक चालू खाती	१२,८७,७१९.	३९
३३,५२,४४४.	**३६**		**७३,८१,०७३.**	**०४**
		गुंतवणूक		
२,४२,८२,८७५.	००	१) बँक मुदत ठेवीत	३,००,२८,७२१.	००
७५,४९,९४,३०६.	००	२) बँक दामदुप्पट ठेवीत	७५,४२,२७,१९१.	००
८,६००.	००	३) बँक व फेडरेशन भाग	८,६००.	००
२५,६६,३७,६३०.	००	४) युनिटी स्मॉल फायनान्स	२५,६६,३७,६३०.	००
१,०३,५९,२३,४११.	**००**		**१,०४,०९,०२,१४२.**	**००**
		निधींची गुंतवणूक		
१५,५४,५७,०५४.	००	१) राखीव निधी	१६,४५,५७,८५७.	००
५,९६,२०८.	००	२) सभासद हितवर्धक निधी	६,३४,२४३.	००
६३,५८,२४४.	००	३) कर्मचारी हितवर्धक निधी	६७,६५,२३४.	००
१६,२४,११,५०६.	**००**		**१७,१९,५७,३३४.**	**००**
		कर्जे		
४,०९,१९,१६९.	००	१) जामिनकी कर्ज	३,३६,६४,८३५.	००
२,४४,३८,८८१.	००	२) दागिना तारण कर्ज	२,४२,३८,१८३.	००
४०,९६,८४३.	६०	३) वाहन तारण कर्ज	५८,४०,०५१.	६०
२,८६,१२,३५१.	००	४) ठेव तारण कर्ज	१,८८,७२,०५४.	००
----		५) शैक्षणिक कर्ज	२९,५६,६५६.	००
१४,८४,०९,०३९.	००	६) गृह तारण कर्ज	१४,५६,४४,२४८.	००
२९,२०,४०,७५३.	७५	७) मालमत्ता तारण कर्ज	२८,८४,०५,८३२.	२५
५३,८५,१७,०३७.	**३५**	(कर्मचारी कर्ज जामिनकी, वाहन व गृह कर्जात वर्ग)	**५१,९६,२१,८५९.**	**८५**
१,७४,०२,०४,३९८.	७१	बेरीज पुढील पानावर	१,७३,९८,६२,४०८.	८९

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह

दि. ३१ मार्च २०२४

२०२२-२०२३ रुपये	पैसे	भांडवल व देणी	२०२३-२०२४ रुपये	पैसे
१,७४,२१,७१,५८०.	२१	बेरीज मागील पानावरुन	१,७५,१०,४०,०००.	३४
		इतर देणी		
३०,२७६.	००	१) न नेलेला लाभांश	४७,१३५.	००
२,५९,०८५.	००	२) अनामत	१,९२,०८५.	००
३८,५४१.	७५	३) एस. आर. ओ. चार्ज	१,०६,९३३.	२५
३,२९०.	००	४) जी. एस. टी. (आऊटपूट)	५५,६२४.	६८
----		५) सॉफ्टवेअर पेमेंट	५०,०००.	००
३१,७२,३९६.	०७	६) चालू देणे	२७,७५,३५०.	८१
३५,०३,५८८.	**८२**		**३२,२७,१२८.**	**७४**
		तरतूदी		
७,९३,७०६.	००	१) कर्मचारी रजेचा पगार तरतूद	१२,९३,७०६.	००
५,४१,०५९.	००	१) ऑडीट फी	६,४७,९६०.	००
५,५५,९६७.	००	२) कर्मचारी बोनस	६,५४,४२५.	००
१२,००,०००.	००	३) निवडणूक खर्च	----	
८,००,०००.	००	४) कर्मचारी ग्रॅच्युटी तरतूद	१०,००,०००.	००
----		५) व्यवसाय उदात्तीकरण व विपणन	१,८९,१४५.	००
२५,००,०००.	००	६) वेतन करार तरतूद	----	
२,०९,३२९.	००	७) कर्मचारी / संचालक प्रशिक्षण	३,५३,८३१.	००
६६,००,०६१.	**००**		**४१,३९,०६७.**	**००**
		निधींच्या गुंतवणूकीवरील व्याज		
२,८३,१३४.	००	१) कर्मचारी हितवर्धक निधी	३,८७,४९२.	००
४,८३,१२७.	००	२) सभासद हितवर्धक निधी	४,२०,३८९.	००
७,६६,२६१.	**००**		**८,०७,८८१.**	**००**
३६,३२,३८९.	००	**थकीत कर्जावरील वसूल न झालेले व्याज**	१,३५,८४,७३३.	५०
२,०४,५९,५०७.	६८	**निव्वळ नफा**	२,०५,९५,४१३.	१६
१,७७,७१,३३,३८७.	**७१**	**एकूण बेरीज**	**१,७९,३३,९४,२२३.**	**७४**

श्री. फ्रान्सिस मस्करनीस
चेअरमन

श्री. अँथनी रॉड्रीग्ज
व्हा. चेअरमन

क्रेडिट सोसायटी लि.

अखेरचा ताळेबंद

२०२२-२०२३ रुपये	पैसे	मालमत्ता व येणी	२०२३-२०२४ रुपये	पैसे
१,७४,०२,०४,३९८.७१		बेरीज मागील पानावरुन	१,७३,९८,६२,४०८.८९	
		डेडस्टॉक		
२,१२,६६५.००		मागील ताळेबंदावरुन	१,९६,०५८.००	
८०,९७७.००		अहवालसाली खरेदी	८९,५८५.२५	
२,९३,६४२.००			२,८५,६४३.२५	
९७,६८४.००		उणे घसारा	८९,५८५.००	
१,९५,९५८.००			**१,९६,०५८.२५**	
		शाखा इमारत		
३८,४१,४७२.००		मागील ताळेबंदावरुन	३६,८६,९८६.००	
----		अहवालसाली खर्च	----	
३८,४१,४७२.००			३६,८६,९८६.००	
१,५४,४८६.००		उणे घसारा	१,५४,४८६.००	
३६,८६,९८६.००			**३५,३२,५००.००**	
		इतर मालमत्ता व अनामत		
५,०००.००	१)	टेलीफोन	५,०००.००	
१,१८,०००.००	२)	फेस्टीव्हल ॲडव्हान्स	१,४४,०००.००	
१,९२,२६४.००	३)	शिल्लक स्टेशनरी	१,७०,५२६.००	
२,००,०००.००	४)	जागा मालक अनामत	२,००,०००.००	
४,४९,१८०.००	५)	एम्.एस.ई.बी. अनामत	३१,३८०.००	
३००.००	६)	बिसलरी पाणी अनामत	३००.००	
१,३२,३६,२५०.००	७)	आयकर (येणे)	१,३२,३६,२५०.००	
१,८८,३६,५६७.००	८)	टी.डी.एस. (येणे)	२,२२,९१,७४२.००	
१,०७४.००	९)	जी.एस.टी. (इनपूट)	१,३८,५५५.१०	
----	१०)	थकीत येणे व्याज	१,३५,८४,७३३.५०	
७,४१०.००	११)	अधेसिव्ह स्टॅम्प	७७०.००	
३,३०,४६,०४५.००			**४,९८,०३,२५६.६०**	
१,७७,७१,३३,३८७.७१		**एकूण बेरीज**	**१,७९,३३,९४,२२३.७४**	

मेसर्स व्हॅलेरीयन रॉड्रिग्ज ॲन्ड कंपनी
सी. ए., वसई
एफआरएन नं. १४६४०३डब्ल्यू

मेसर्स योगेश पाटील ॲन्ड असो.
सनदी लेखापाल
नामतालिका क्र. १५०२७, वर्गवारी : अ-१

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे, पो. वसई रोड, ता. वसई, जि. पालघर ४०१ २०२.

✣ शासकीय लेखा परिक्षकाचा अहवाल ✣

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ आणि
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९(३) अन्वये द्यावयाचा)

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
यंग मेन्स असोसिएशन बिल्डिंग, चुळणे,
ता. वसई, जि. पालघर.

विषय : नेमणूक पत्र दिनांक २१-०९-२०२३ चे
सनदी लेखापरीक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल.

१) **कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**, वसई यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरीक्षण आम्ही केले आहे. त्यामध्ये ताळेबंद पत्रक ३१ मार्च २०२४ पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा आणि तोटा विवरणपत्रक आणि हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरीक्षण आम्ही १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंतचे केले आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची **जबाबदारी**

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम याअन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील. मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी

३) केलेल्या लेखापरीक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरीक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरीक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नीतितत्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे. आणि लेखापरीक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरीक्षेमध्ये लेखापरीक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरीक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे, यामध्ये महत्त्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीमध्ये योग्य आहे. लेखापरीक्षेमध्ये जमाखर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोजनाचा वापर आणि जमाखर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५) लेखापरीक्षेचा पुरावा जो आम्ही मिळवला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

अभिप्राय :

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला जरूरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केला आहे.

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत दिनांक ३१ मार्च २०२४

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च, त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी, आणि

इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदींनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

आम्ही अहवाल देतो की,

८) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरुर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहे.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंद पत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) **आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा-तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरीक्षा केलेल्या शाखांचे ताळेबंद पत्रक शाखा लेखापरीक्षकांनी केलेले असून, तो आम्हाला जरूरीचा आहे त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) वरील दाखला प्रसारीत करण्यात येणाऱ्या लेखापरिक्षण प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून सन २०२३-२०२४ सालाकरिता संस्थेस लेखापरीक्षा वर्ग '**ब**' देण्यात येत आहे.

स्थळ : नवी मुंबई.
दिनांक : १३-०७-२०२४

मेसर्स योगेश पाटील ॲन्ड असो.
सनदी लेखापाल
नामतालिका क्र. १५०२७
वर्गवारी : अ-१

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

✧ दशवार्षिक प्रगती तक्ता ✧

(रुपये लाखांत)

सन	सभासद संख्या	भाग भांडवल	राखीव व इतर निधी	ठेवी	गुंतवणूक	कर्जे	खेळते भांडवल	निव्वळ नफा	लाभांश	ऑडीट वर्ग
२०१३-२०१४	७६९७	४५०.९८	१२७८.९६	१०८१२.६९	६८०२.३२	५८४८.७१	१२७७४.४८	१९०.०४	१५%	अ
२०१४-२०१५	७,७००	४६५.९०	१५१३.९०	१२०३८.१८	८५३८.९२	५५९०.९४	१४२६८.६४	२१०.१६	१५%	अ
२०१५-२०१६	७,७३३	४८८.९५	१८१३.६९	१३११७.२६	१०९०८.००	५३६५.३४	१६४०१.७२	२४०.५८	१५%	अ
२०१६-२०१७	७७९१	५०५.८९	२१२०.४२	१४२०६.५३	११८५०.८४	५२४३.७८	१७२२४.९३	२४७.३९	१५%	अ
२०१७-२०१८	७८१६	५२१.३८	२४१९.०९	१४०३५.२८	१२४७१.९१	५२००.७४	१७७५०.४१	२२८.४६	१५%	अ
२०१८-२०१९	७९१६	५५५.१७	२६८४.८३	१४६१७.४०	१३३९३.३०	५६६४.५३	१९१५९.४१	२६३.८८	१५%	अ
२०१९-२०२०	७९७६	५५७.५१	३११६.०२	१२७१६.२८	११७३२.५१	५७४४.५१	१७७१२.९४	१९०.१३	१०%	अ
२०२०-२०२१	७९४५	५६४.६८	३५१२.९६	१३३५६.५१	११४१७.७४	५९२३.६०	१७७६७.२८	१५५.५७	८%	अ
२०२१-२०२२	७८७१	५५९.४२	३७१५.८१	१३३४२.१३	११७९५.८६	५७०५.५७	१७८८७.३७	१८३.००	९%	अ
२०२२-२०२३	८५३९	५६३.०९	३९४३.४६	१२७३१.४७	११९८३.३४	५३८५.१७	१७७७१.३३	२०४.५९	१०%	ब
२०२३-२०२४	८५२७	५६३.६८	४१०५.२४	१२८४१.३६	१२१२८.५९	५१९६.२१	१७९३३.९४	२०५.९५	१०% घोषित	ब

कंप्यानियन्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

संचालक मंडळ सन २०१६ ते २०२१



श्री. फ्रान्सिस मस्करनिस
चेअरमन



श्री. अँथनी रॉड्रिग्ज
व्हा. चेअरमन



श्री. फ्रान्सिस नुनीस
संचालक



श्री. मनवेल (राजू) डाबरे
संचालक



श्री. मनवेल फरोज
संचालक



श्री. मनवेल पॉल कोलासो
संचालक



श्री. पायस फ्रान्सिस मिरांडा
संचालक



श्री. शैलेश राऊत
संचालक



श्री. विनोद मोहन पाटील
संचालक



सौ. अपलोनिया मिरांडा
संचालिका



सौ. इजाबेल मिरांडा
संचालिका



सौ. शैला अंड्राडीस
चीफ मॅनेजर

भावपूर्ण श्रद्धांजलि



स्व. थॉमस डॉमणिक डिसोजा

कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचे एक प्रवर्तक व माजी व्हाईस चेअरमन आणि माजी संचालक स्व. थॉमस डॉमणिक डिसोजा ह्यांचे दि. ३ मार्च २०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. ते एक धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते होते. तसेच 'यंग मेन्स असोसिएशन' या संस्थेचे माजी अध्यक्ष होते. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हिच प्रार्थना.



स्व. वतलन आलेक्स घोन्सालविस

कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेची माजी संचालिका स्व. वतलन आलेक्स घोन्सालविस ह्यांचे दि. २४ नोव्हेंबर २०२३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हिच प्रार्थना.



स्व. अंतोन बस्त्याव असाव

कंप्यानियन्स को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचे प्रवर्तक स्व. अंतोन बस्त्याव असाव ह्यांचे दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हिच प्रार्थना.



स्व. सि. ऑल्गा परेरा

चुळणे पॅरीशच्या सि. ऑल्गा परेरा (प्रेषितांची राणी संस्था) ह्यांचे दि. २२ मे २०२४ रोजी दु:खद निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ५३ वर्षे प्रेषितीय कार्य करणाऱ्या सि. ऑल्गा परेरा यांना स्वर्गराज्यात चिरशांती लाभावी हिच प्रार्थना.



स्व. फादर मायकल (मिंगेल) फ्रान्सिस डिसोजा

चुळण गावचे सुपुत्र स्व. फा. मायकल (मिंगेल) फ्रान्सिस डिसोजा ह्यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी दु:खद निधन झाले. ४५ वर्षांच्या प्रेषितीय कार्यात औरंगाबाद धर्मप्रांतात त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे. त्यांना स्वर्गराज्यात चिरशांती लाभावी हिच प्रार्थना.

मुद्रक : वसई तालुका सहकारी मुद्रणालय लि., बंगली, आक्टण, सांडोर, वसई (प.) मो. : ८३९०५०९८८०